**"गोड मुलांनो - सर्वांना ही आनंदाची बातमी सांगा की आता डीटी डिनायस्टी (दैवी कुळाची) स्थापन होत आहे, जेव्हा व्हाईसलेस वर्ल्ड असेल तेव्हा बाकीचे सर्व नष्ट होतील"**

प्रश्नः- रावणाचा शाप कधी मिळतो, शापित होण्याची निशाणी काय आहे?

उत्तरः- जेव्हा तुम्ही देह-अभिमानी बनता तेव्हा रावणाचा शाप मिळतो. शापित आत्मे गरीब विकारी बनत जातात, खाली उतरत जातात (अधःपतन होते). आता बाबांकडून वारसा घेण्यासाठी देही-अभिमानी बनायचे आहे. आपल्या दृष्टी-वृत्तीला पावन बनवायचे आहे.

ओम् शांती. रुहानी बाबा बसून रुहानी मुलांना ८४ जन्मांची कहाणी ऐकवतात. हे तर समजता सगळेच काही ८४ जन्म घेत नसतील. तुम्हीच सर्वप्रथम सतयुग आदिमध्ये पूज्य देवी-देवता होता. भारतामध्ये पहिले पूज्य देवी-देवता धर्माचेच राज्य होते. लक्ष्मी-नारायणाचे राज्य होते तर जरूर डिनायस्टी असेल. राजाई घराण्याचे मित्र-नातलग देखील असतील. प्रजा देखील असेल. ही जशी एक कहाणी आहे. तुम्हाला आठवते आहे की, ५ हजार वर्षांपूर्वी देखील यांचे राज्य होते. भारतामध्ये आदि सनातन देवी-देवता धर्माचे राज्य होते. हे बेहदचे बाबा समजावून सांगत आहेत, ज्यांना नॉलेजफुल म्हटले जाते. नॉलेज कोणत्या गोष्टीचे? मनुष्य समजतात ते सर्वांच्या अंतर्मनातील, कर्म-विकर्माला जाणणारे आहेत. परंतु आता बाबा समजावून सांगतात - प्रत्येक आत्म्याला आपला-आपला पार्ट मिळालेला आहे. सर्व आत्मे आपल्या परमधाममध्ये राहतात. त्यामध्ये सर्व पार्ट भरलेला आहे. तयारीत बसले आहेत की जाऊन कर्मक्षेत्रा वर आपला पार्ट बजावावा. हे देखील तुम्ही समजता की, सर्व काही आपण आत्मे करतो. आत्माच म्हणते - हे आंबट आहे, हे खारट आहे. आत्माच समजते - आम्ही आता विकारी, पाप-आत्मे आहोत. आसुरी स्वभाव आहे. आत्माच इथे कर्मक्षेत्रावर शरीर घेऊन सर्व पार्ट बजावते. तर हा निश्चय करायला हवा ना! मी आत्माच सर्व काही करते. आता बाबांना भेटलो आहोत पुन्हा ५ हजार वर्षांनंतर भेटणार. हे देखील समजता पूज्य आणि पुजारी, पावन आणि पतित बनत आलो आहोत. जेव्हा पूज्य असतात तेव्हा कोणीही पतित असू शकत नाही. जेव्हा पुजारी असतात तेव्हा कोणीही पावन असू शकत नाही. सतयुगामध्ये आहेतच पावन, पूज्य. जेव्हा द्वापर पासून रावणराज्य सुरु होते तेव्हाच पतित, पुजारी बनतात. शिवबाबा म्हणतात - बघा शंकराचार्य सुद्धा माझा पुजारी आहे. माझी पूजा करतात ना. शिवाचे चित्र कोणाकडे हिऱ्याचे, कोणाकडे सोन्याचे, कोणाकडे चांदीचे असते. आता जे पूजा करतात, त्या पुजाऱ्याला पूज्य तर म्हणू शकत नाही. साऱ्या दुनियेमध्ये यावेळी एकही पूज्य असू शकत नाही. पूज्य पवित्र असतात मग अपवित्र बनतात. पवित्र असतातच नव्या दुनियेमध्ये. पवित्रच पुजले जातात. जसे कुमारी जेव्हा पवित्र आहे तर पुजण्यालायक आहे, अपवित्र बनते तर मग सर्वांपुढे डोके झुकवावे लागते. पूजेची किती सामग्री आहे. कोठेही प्रदर्शनी, म्युझियम इत्यादी खोलता तर वरती त्रिमूर्ती शिव जरूर पाहिजे. खाली हे लक्ष्मी-नारायण एम ऑब्जेक्ट. आम्ही या पूज्य देवी-देवता धर्माची स्थापना करत आहोत. तिथे मग इतर कोणताही धर्म उरत नाही. तुम्ही सांगू शकता, प्रदर्शनीमध्ये तर भाषण इत्यादी करू शकणार नाही. समजावून सांगण्यासाठी मग वेगळा प्रबंध असायला हवा. मुख्य गोष्टच ही आहे - आम्ही भारतवासीयांना आनंदाची बातमी ऐकवतो. आम्ही हे राज्य स्थापन करत आहोत. ही डीटी डिनायस्टी होती (दैवी कुळ होते), आता नाहीये, पुन्हा याची स्थापना होत आहे, बाकीचे सर्व नष्ट होतील. सतयुगामध्ये जेव्हा हा एक धर्म होता तेव्हा मग हे अनेक धर्म नव्हते. आता हे अनेक धर्म एकत्र येऊन एक होतील, हे तर होऊ शकत नाही. ते येतातच एकमेकांच्या मागोमाग आणि मग वृद्धी होत राहते. पहिला आदि सनातन देवी-देवता धर्म प्रायः लोप आहे. असा कोणीही नाही जो स्वतःला देवी-देवता धर्माचा म्हणू शकेल. याला म्हटलेच जाते विशश वर्ल्ड (विकारी दुनिया). तुम्ही म्हणू शकता - आम्ही तुम्हाला आनंदाची बातमी ऐकवतो - शिवबाबा व्हाईसलेस वर्ल्ड (निर्विकार दुनिया) स्थापन करत आहेत. आम्ही प्रजापिता ब्रह्माची संतान ब्रह्माकुमार- कुमारी आहोत ना. सर्वप्रथम तर आम्ही भाऊ-भाऊ आहोत नंतर असते रचना, तर जरूर भाऊ-बहीणी होणार. सर्वजण म्हणतात - बाबा, आम्ही तुमची मुले आहोत तर भाऊ-बहीणीची विकारी दृष्टी जाऊ शकत नाही. हा अंतिम जन्म पवित्र बनायचे आहे, तेव्हाच पवित्र विश्वाचे मालक बनू शकाल. तुम्ही जाणता गती-सद्गती दाता आहेतच एक

बाबा. जुनी दुनिया बदलून जरूर नवी दुनिया स्थापन होणार आहे. ती तर ईश्वरच करतील. आता ते नवीन दुनिया कशी क्रिएट करतात, हे तर तुम्ही मुलेच जाणता. आता जुनी दुनिया देखील आहे, ही काही नष्ट झालेली नाहीये. चित्रांमध्ये देखील आहे ब्रह्मा द्वारे स्थापना. यांचा हा अनेक जन्मांच्या अंताचा जन्म आहे. ब्रह्माचे जोडपे नाही, ब्रह्माचे तर अ‍ॅडॉप्शन (दत्तकविधान) आहे. समजावून सांगण्याची चांगली युक्ती पाहिजे. शिवबाबा ब्रह्मामध्ये प्रवेश करून आम्हाला आपले बनवतात. शरीरामध्ये प्रवेश करतील तेव्हाच तर म्हणतील - ‘माझ्या आत्म्यांनो, तुम्ही माझी मुले आहात’. आत्मे तर आहेतच मग जेव्हा ब्रह्माद्वारे सृष्टी रचली जाईल तेव्हा जरूर ब्रह्माकुमार-कुमारी असतील ना, तर बहीण-भाऊ झाले. दुसरी दृष्टी नाहीशी होते. आम्ही शिवबाबांकडून पावन बनण्याचा वारसा घेतो. रावणाकडून आम्हाला शाप मिळतो. आता आम्ही देही-अभिमानी बनतो तर बाबांकडून वारसा मिळतो. देह-अभिमानी बनल्याने रावणाचा शाप मिळतो. शाप मिळाल्याने खाली उतरत जातात. आता भारत शापित आहे ना. भारताला इतके कंगाल विकारी कोणी बनवले? कोणाचा तरी शाप आहे ना. हा आहे रावणरूपी मायेचा शाप. दरवर्षी रावणाला जाळतात तर जरूर शत्रू आहे ना. धर्मामध्येच ताकद असते. आता आम्ही देवता धर्माचे बनतो. बाबा नवीन धर्माची स्थापना करण्याच्या निमित्त आहेत. किती शक्तिशाली धर्म स्थापन करतात. आम्ही बाबांकडून शक्ती घेतो, साऱ्या विश्वावर विजय प्राप्त करतो. आठवणीच्या यात्रेनेच शक्ती मिळते आणि विकर्म विनाश होतात. तर हे देखील एक आकर्षण लिहिले पाहिजे. आम्ही आनंदाची बातमी ऐकवतो. आता या धर्माची स्थापना होत आहे ज्यालाच हेवन, स्वर्ग म्हणतात. असे मोठ्या-मोठ्या अक्षरामध्ये लिहा. बाबा सल्ला देतात - सर्वात मुख्य आहे हे. आता आदि सनातन देवी-देवता धर्माची स्थापना होत आहे. प्रजापिता ब्रह्मा देखील बसले आहेत. आम्ही प्रजापिता ब्रह्माकुमार-कुमारी श्रीमतावर हे कार्य करत आहोत. ब्रह्माचे मत नाही, श्रीमत आहेच परमपिता परमात्मा शिवाचे, जो सर्वांचा पिता आहे. बाबाच एका धर्माची स्थापना, अनेक धर्मांचा विनाश करतात. राजयोग शिकून हे बनतात. आम्ही देखील हे बनत आहोत. आम्ही बेहदचा संन्यास केला आहे कारण जाणतो - ही जुनी दुनिया भस्म होणार आहे. जसे हदचे पिता नवीन घर बनवतात मग जुन्यातून ममत्व नष्ट होते. बाबा म्हणतात - ही जुनी दुनिया नष्ट होणार आहे. आता तुमच्यासाठी नवीन दुनिया स्थापन करत आहे. तुम्ही शिकताच मुळी - नवीन दुनियेकरिता. अनेक धर्मांचा विनाश, एका धर्माची स्थापना संगमावरच होते. युद्ध होईल, नैसर्गिक आपत्ती देखील येतील. सतयुगामध्ये जेव्हा यांचे राज्य होते तेव्हा इतर कोणतेही धर्म नव्हते. मग बाकीचे सर्व कुठे होते? हे ज्ञान बुद्धीमध्ये ठेवायचे आहे. असे नाही की, हे नॉलेज बुद्धीमध्ये लक्षात ठेवतो तेव्हा दुसरे काम करत नाही, किती विचार डोक्यात असतात. चिठ्ठी लिहिणे, वाचणे, घराची काळजी घेणे, तरी देखील बाबांची आठवण करत राहतो. बाबांची आठवण केली नाही तर विकर्म कशी विनाश होतील.

आता तुम्हा मुलांना ज्ञान मिळाले आहे, तुम्ही अर्ध्या कल्पासाठी पूज्य बनत आहात. अर्धे कल्प पुजारी तमोप्रधान असतात मग अर्धे कल्प पूज्य सतोप्रधान असतात. आत्मा परमपिता परमात्म्याशी योग लावल्यानेच पारस बनते. आठवण करता-करता आयर्न एज पासून गोल्डन एजमध्ये जाईल. पतित पावन एकालाच म्हटले जाते. पुढे जाऊन तुमचा प्रभाव पडेल. हे तर सर्व धर्मांसाठी आहे. तुम्ही म्हणता देखील - ‘बाबा म्हणतात की पतित-पावन मीच आहे. माझी आठवण करा तर तुम्ही पावन बनाल’. बाकीचे सगळे हिशोब चुकता करून जातील. कुठेही गोंधळून जाता तर विचारू शकता. सतयुगामध्ये असतातच फार थोडे. आता तर अनेक धर्म आहेत. जरूर हिशोब चुकता करून मग पुन्हा तसेच बनतील, जसे होते. डिटेलमध्ये का जावे. जाणतो प्रत्येक जण आपला-आपला पार्ट येऊन बजावतील. आता सर्वांना परत जायचे आहे कारण हे सर्वजण (इतर धर्मांचे) सतयुगामध्ये अस्तित्वात नव्हते. बाबा येतातच एका धर्माची स्थापना, अनेक धर्मांचा विनाश करण्यासाठी. आता नवीन दुनियेची स्थापना होत आहे. मग सतयुग जरूर येईल, चक्र जरूर फिरणार. टू मच विचारात जाऊ नये, मूळ गोष्ट आम्ही सतोप्रधान बनलो तर उच्च पद मिळवू शकणार. कुमारांना तर यामध्येच व्यस्त रहायचे आहे, मुलीची कमाई आई-वडील खात नाहीत. परंतु आजकाल भुकेलेले आहेत त्यामुळे कुमारींना देखील कमवावे लागते. तुम्ही समजता आता पवित्र बनून पवित्र दुनियेचे मालक बनायचे आहे. आम्ही राजयोगी आहोत, बाबांकडून वारसा जरूर घ्यायचा आहे.

आता तुम्ही पांडव सेनेचे बनले आहात. आपली सर्विस करत असताना देखील हे लक्षात ठेवायचे आहे, आपण जाऊन सर्वांना रस्ता सांगावा. जितके करू, तितके उच्च पद प्राप्त होईल. बाबांना विचारू शकता - या अवस्थेमध्ये मेलो तर आम्हाला काय पद मिळेल? बाबा ताबडतोब सांगतील - सेवा करत नाहीस त्यामुळे साधारण घरामध्ये

जाऊन जन्म घेशील'. मग परत येऊन ज्ञान घेणे हे तर कठीण आहे कारण छोटा मुलगा इतके ज्ञान आत्मसात करू शकत नाही. समजा फक्त दोन-तीन वर्षेच ज्ञानामध्ये चालतात तर ते काय शिकू शकणार? बाबा तुम्हाला सांगतील - तू एखाद्या क्षत्रिय कुळामध्ये जाऊन जन्म घेशील. मागाहून कुठे डबल ताज मिळेल. स्वर्गाचे संपूर्ण सुख प्राप्त करू शकणार नाहीत. जे पूर्ण सेवा करतील, शिकतील तेच संपूर्ण सुख प्राप्त करतील. नंबरवार पुरुषार्था नुसार. हाच ध्यास ठेवायचा आहे - आता बनलो नाही तर कल्प-कल्प बनणार नाही. प्रत्येकजण स्वतःला जाणू शकतो, आपण किती मार्कांनी पास होऊ. सर्व जाणतात मग म्हटले जाते - भावी. मन दुःखी होईल ना. बसल्या-बसल्या आपल्याला हे काय झाले! बसल्या-बसल्या मनुष्य मरूनही जातात म्हणून बाबा म्हणतात आळस करू नका. पुरुषार्थ करून पतितापासून पावन बनत रहा, रस्ता सांगत रहा. कोणीही मित्र-नातलग इत्यादी असतील, त्यांच्या विषयी दया वाटली पाहिजे. तुम्ही बघता की हे विकाराशिवाय, खराब गोष्टी खाल्ल्यावाचून राहू शकत नाहीत, तरी देखील समजावून सांगत राहिले पाहिजे. ऐकत नसतील तर समजा हे आपल्या कुळाचे नाहीत. प्रयत्न करून माहेरचे, सासरचे कल्याण करायचे आहे. अशी देखील चलन (वर्तन) असू नये जे कोणी म्हणतील की हे आमच्याशी बोलत सुद्धा नाहीत, तोंड फिरवले आहे. नाही, सर्वांना जोडायचे आहे. आपण त्यांचेही कल्याण करावे. खूप दयाळू बनायचे आहे. आपण सुखाच्या दिशेने जात आहोत तर इतरांना देखील रस्ता सांगावा. आंधळ्यांची काठी तुम्ही आहात ना. गातात - 'अन्धों की लाठी तू'. डोळे तर सर्वांना आहेत तरी देखील बोलावतात कारण ज्ञानाचा तिसरा नेत्र नाहीये. सुख-शांतीचा रस्ता सांगणारे एक बाबाच आहेत. हे तुम्हा मुलांच्या बुद्धीमध्ये आता येते आहे. पूर्वी थोडेच समजत होता. भक्तीमार्गामध्ये किती सारे मंत्र जपतात. राम-राम म्हणत माशांना खाऊ घालतात, मुंग्यांना खाऊ घालतात. आता ज्ञान मार्गामध्ये तर काहीच करण्याची गरज नाहीये. पक्षी तर खंडीभर मरून पडतात. एकच वादळ येते आणि कित्येकजण मरतात. नैसर्गिक आपत्ती तर आता खूप जोराने येतील. ही रिहर्सल होत राहील. हे सर्व विनाश तर होणारच आहे. आतून वाटते - आता आपण स्वर्गामध्ये जाणार. तिथे आपले फर्स्टक्लास महाल बनवणार. जसे कल्पापूर्वी बनवले होते. बनवतील तरी देखील तसेच जे कल्पापूर्वी बनवले होते. त्यावेळी ती बुद्धी येईल. त्याचा विचार आत्ता का करावा, यापेक्षा तर बाबांच्या आठवणीत राहावे. आठवणीच्या यात्रेला विसरू नका. महाल तर बनतीलच कल्पापूर्वीप्रमाणे. परंतु आता आठवणीच्या यात्रेमध्ये तोड निभवायची आहे आणि खूप आनंदात रहायचे आहे की आम्हाला पिता, टीचर, सद्गुरू भेटले आहेत. या आनंदाने तर रोमांच उभे राहिले पाहिजेत. तुम्ही जाणता आम्ही आलोच आहोत अमरपुरीचा मालक बनण्यासाठी. हा आनंद स्थायी (चिरकाळ) राहिला पाहिजे. इथे राहील तेव्हाच मग तो २१ जन्म चिरकाळ होईल. अनेकांना आठवण करून देत रहाल तर तुमची स्वतःची आठवणही वाढेल. मग त्याची सवय होईल. जाणता या अपवित्र दुनियेला आग लागणार आहे. तुम्ही ब्राह्मणच आहात ज्यांना हा विचार आहे - एवढी सारी दुनिया नष्ट होणार आहे. सतयुगामध्ये हे काहीही कळणार सुद्धा नाही. आता अंत आहे, तुम्ही आठवणीसाठी पुरुषार्थ करत आहात. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

१) पतितापासून पावन बनण्याच्या पुरुषार्थामध्ये आळस करायचा नाही. कोणीही मित्र-नातलग इत्यादी असतील त्यांच्यावर दया करून ज्ञान समजावून सांगायचे आहे, सोडून द्यायचे नाही.

२) असा व्यवहार ठेवायचा नाही जे कोणी म्हणेल की यांनी तर तोंड फिरवले आहे. दयाळू बनून सर्वांचे कल्याण करायचे आहे, बाकी सर्व विचार सोडून देऊन एका बाबांच्या आठवणीमध्ये रहायचे आहे.

वरदान:- सत्यता, स्वच्छता आणि निर्भयता यांच्या आधारे प्रत्यक्षता करणारे रमता योगी भव

परमात्म प्रत्यक्षतेचा आधार सत्यता आहे आणि सत्यतेचा आधार स्वच्छता आणि निर्भयता आहे. जर कोणत्याही प्रकारची अस्वच्छता अर्थात सच्चाई सफाईची कमी आहे, किंवा आपल्याच तमोगुणी संस्कारांवर विजयी बनण्यामध्ये, संस्कारांशी जुळवून घेण्यामध्ये किंवा विश्व सेवेच्या क्षेत्रामध्ये आपल्या सिद्धांतांना सिद्ध करण्यामध्ये जर भय वाटत असेल तर प्रत्यक्षता होऊ शकणार नाही; म्हणून सत्यता आणि निर्भयतेला धारण करून एकाच धूनमध्ये मस्त राहणारे

रमता योगी, सहज राजयोगी बना तर अंतिम प्रत्यक्षता सहजच होईल.

बोधवाक्य:- बेहदची दृष्टी, वृत्तीच युनिटीचा (एकतेचा) आधार आहे त्यामुळे हदमध्ये येऊ नका.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारे:- अशरीरी आणि विदेही स्थितीचा अभ्यास वाढवा. अशरीरी बनणे वायरलेस सेट आहे. व्हाईसलेस बनणेच वायरलेस सेटची सेटिंग आहे. जरा सुद्धा अंशातीलही अंश मात्र विकार वायरलेसच्या सेट ला बेकार करून टाकेल; म्हणून आता कर्मबंधनी पासून कर्मयोगी बना. अनेक बंधनांमधून मुक्त एका बाबांशी सर्व नाती समजा तेव्हा सदा एव्हर रेडी रहाल. चेक करा - आतमध्ये कोणताही विकार लपलेला तर नाहीये ना?